॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

जळगाव-४२५००१ ☎:(०२५७) २२५७२७५

# अनगड लाकड विक्री बोली लिलाव सूचना

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ परिसरातील अनगड लाकड बोली लिलावाद्वारे विक्री करावयाची असून नोंदणीकृत वखार (सॉमिल), स्वत: मालक किंवा लाकड विक्रेते हे भाग घेवू शकतात. लाकड खरेदीदार जे असतील त्यांनी बोली लिलावात भाग घेण्यासाठी विद्यापीठाने ठरवून दिलेले `प्रवेश शुल्क (फी)` जे खरेदीदार भरतील त्यानांच लिलावात भाग घेता येईल. भाग घेण्यासाठीच्या अटी व शर्तीचे माहितीपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर *(www.nmu.ac.in)* निशुल्क उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. **तसेच सदर माहितीचे पत्रक (हार्ड कॉपी) बोली लिलावात जे अनगड लाकड खरेदीदार फी भरुन भाग घेतील त्यानांच देण्यात येईल.**

**टिप :**
१) विद्यापीठाच्या संकेतस्थळावर अटी व शर्तीचे माहितीपत्रक दि. १९/०९/२०१९ ते २६/०९/२०१९ वेळ दु. १७.३० पर्यंत पाहता येईल.
२) अटी व शर्तीत लाकडाचे बक्कलची माहिती दिली आहे. त्यानुसार प्रत्यक्ष येवून लाकडांच्या प्रत्येक बक्कलची पाहणी त्या त्या बक्कलचा लिलाव सुरु होण्याच्या आधी पर्यंत पाहता येईल.
३) लाकूड विक्री बोली लिलाव दि. २६/०९/२०१९ ते दि. २८/०९/२०१९ दररोज वेळ स. ११.०० ते १.३० व दु. २.३० ते दु. ५.०० पर्यंत या वेळात होईल.
४) बोलीतील मान्य रक्कम बोली बोलणाऱ्यास त्याच दिवशी दिलेल्या वेळेच्या आत चेक जमा करावयाचा आहे.
५) प्रत्येक खरेदीदार यांनी येतांना चेक बुक सोबत आणावयाचे आहे.

**स्थळ** :अनगड लाकड विक्री अटी व शर्तीतील क्र. ३ च्या तक्त्यात दर्शविले आहे.

दिनांक : १८/०९/२०१९ कुलसचिव

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

**कवयित्री बहिनाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**दि. १७/०८/२०१९**

**विषय :- विद्यापीठ परिसरातील विविध ठिकाणी अनगड लाकडांचे ३० वक्कल आहेत. सदर लाकडांचा बोली लिलावात भाग घेण्याच्या अटी शर्ती खालील प्रमाणे..**

**अटी शर्ती :-**

(1) विद्यापीठ परिसरात विविध ठिकाणी अनगड लाकड गोळा करून त्याचे वर्गीकरण करून वक्कल (ढिग) केले आहेत प्रत्येक वक्कलला क्र. दिला असून वक्कल क्र. १ ते ३० असे एकूण ३० वक्कल आहेत.

(2) **ज्या व्यक्तीस, संस्थेस, वखार (सॉमील) मालक, लाकूड विक्रेते** ज्यांनाही ज्या वक्कलचे लाकड विकत घ्यावयाचे आहे व जेवढया वक्कलचे लाकड विकत घ्यावयाचे आहे तेवढया वक्कलचे लाकड विकत घेवू शकतात. तसेच ज्यासही बोली लिलावात भाग घ्यावयाचा आहे. त्या प्रत्येकास फी भरतांना प्रत्येकाने आपले स्वत:चे पॅनकार्ड किंवा आधारकार्डची प्रत जमा करणे आवश्यक आहे. तसेच संस्था,वखार(सॉमील) मालक, लाकड विक्रेते यांनी रजिस्ट्रेशनची प्रत जमा करणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रत्येकाने सदरचे कागदपत्र घेवून येणे आवश्यक आहे.

(3) खालील तक्त्यात अनु क्र. A To U मध्ये दर्शवलेल्या अनगड लाकडांचे ३० ढिग रचलेले असून त्यांना वक्कल क्र. ०१ ते ३० दिले आहेत. त्या ३० वक्कलांची अनु.क्र. A To U मध्ये विभागणी केली आहे. A To U क्रमांकामध्ये जे ही वक्कल क्रमांक दर्शवलेले व ज्यात एकापेक्षा जास्त वक्कल एकत्र आहेत. त्या क्रमानुसार बोली लिलावात भाग घेण्यासाठीची **प्रवेश 'फी'** खालील तक्त्यात दर्शवलेली आहे. दर्शवलेली फी भरल्याशिवाय बोली लिलावात भाग घेता येणार नाही. त्या प्रत्येकात दर्शवलेली **'फी ' ना परतावा' आहे.(Non Refundable). ती प्रशासकिय खर्चापोटी जमा करावयाची आहे.**

| अनु. क्र. | अनगड लाकडाचा प्रकार | अंदाजे साईज | नग | वक्कल क्र. | विद्यापीठ परिसरातील लाकडांच्या वक्कलचे ठिकाण | लिलावात भाग घेण्याची प्रवेश फी |
|---|---|---|---|---|---|---|
| A | साग जाड दांडी | ८' ते १५'लांब | २२ | ०१ | स्पर्धा परीक्षा केंद्र इमारत जवळ | ३००/- |
| B | साग बारीक दांडी | ६' ते १२'लांब | ३२ | ०२ | -----॥---- | १००/- |
| C | जाड मिक्स लाकड (सुबाभुळ, काटेरी बाभुळ, निलगिरी , गुलमोहर, इत्या.) | ५' ते १२'लांब | लाकडांचा ढीग | ०३, | -----॥---- | २००/- |
| D | जाड जळणासाठीचे लाकड (सुबाभुळ, काटेरी बाभुळ,निलगिरी ,गुलमोहर,इत्या.) | २' ते १०' लांब | ---॥---- | ०४ | -----॥---- | ३००/- |
| E | जाड जळणासाठीचे लाकड (सुबाभुळ, काटेरी बाभुळ,निलगिरी, गुलमोहर,इत्या.) | २' ते ८' लांब | ---॥---- | ०५ | सिनेटहॉल इमारतमागे | ३००/- |
| F | जाड मिक्स लाकड (सुबाभुळ, काटेरी बाभुळ, निलगिरी, गुलमोहर, इत्या.) | ५' ते १२'लांब | ---॥---- | ०६ | -----॥---- | ३००/- |
| G | मध्यम जाड मिक्स लाकड (सुबाभुळ, काटेरी बाभुळ, निलगिरी, गुलमोहर,इत्या.) | ५' ते ८' लांब | ---॥---- | ०७ | -----॥----- | ३००/- |
| H | जाड मिक्स लाकड (सुबाभुळ, काटेरी बाभुळ, निलगिरी, इत्या.) | ३' ते ५' लांब | ---॥---- | ०८ | ----॥---- | ३००/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| I | सुबाभुळ बारीक दांडी | ८' ते १२'लांब | लाकडांचा ढीग | १० | कर्मचारी भवन | १००/- |
| J | सुबाभुळ मध्यम जाड दांडी | ९' ते १४'लांब | ---||--- | ११ | -----||---- | २००/- |
| K | नीम लाकड | ४' ते ६' लांब | ---||--- | १२ | -----||---- | १००/- |
| L | जाड मिक्स लाकड (सुबाभुळ, काटेरी बाभुळ) | ७' ते १०' लांब | ---||--- | १३ | -----||---- | ३००/- |
| | मध्यम जाड मिक्स (सुबाभुळ, काटेरी बाभुळ) | ७' ते १२' लांब | ---||--- | १४ | -----||---- | |
| | मध्यम जाड मिक्स (सुबाभुळ, काटेरी बाभुळ) | ४' ते ७' लांब | ---||--- | १५ | -----||---- | |
| M | जाड जळणासाठीचे लाकड (सुबाभुळ, काटेरी बाभुळ) | ३' ते ८' लांब | ---||--- | १६,१७, २१ | -----||---- | ३००/- |
| N | मध्यम जाड लाकड (विविध प्रकारचे काटेरी झाडांचे लाकड) | ३' ते ७' लांब | ---||--- | १९ | -----||---- | ३००/- |
| O | सुबाभुळ बारीक दांडी | ६' ते ९' लांब | ---||---- | २० | कर्मचारी भवन, | १००/- |
| P | बारीक जळणाची लाकड | -------- | ---||---- | १८,२२, २३ | ----||----- | २००/- |
| Q | झाडांची मुळासकट खोड | -------- | ---||--- | ०९,२४ | सिनेटहॉलइमारतमागे व कर्मचारीभवनजवळ | १००/- |
| R | मध्यम जाड लाकड (विविध प्रकारचे काटेरी झाडांचे लाकड) | ३' ते ७' लांब | ---||--- | २५ | बा.ज.जी. मुलींचे वसतिगृहजवळ | २००/- |
| S | मध्यम जाड लाकड (विविध प्रकारचे काटेरी झाडांचे लाकड) | ३' ते ७' लांब | ---||--- | २७ | -----||---- | २००/- |
| T | मध्यम जाड लाकड (विविध प्रकारचे काटेरी झाडांचे लाकड) | ३' ते ७' लांब | ---||--- | २९ | -----||---- | २००/- |
| U | बारीक जळणाची मिक्स लाकड (काटेरी झाड) | -------- | ---||---- | २६,२८, ३० | बा.ज.जी. मुलींचे वसतिगृहजवळ | २००/- |

विद्यापीठ परिसरात विविध ठिकाणी वरील तक्त्यातील अनु क्र. A to U मध्ये दर्शवलेल्या लाकडांचे रचलेले ३० ढिग (वक्कल क्र. १ ते ३०) मी खरेदीदार बोली लिलाव सुरू होण्यापूर्वी पाहिली आहेत.

(4) ज्याही बोली लिलावात भाग घेण्यासाठी ज्या खरेदीदाराने ज्याही अनुक्रमाकांतील वक्कलची फी भरली, फी भरल्यानंतर त्या अनुक्रमांकाच्या बोली लिलावात भाग घेतला नाही, बोललो नाही म्हणून त्या व्यक्तीस (खरेदीदार) त्या अनुक्रमांकातील त्या वक्कलची भरलेली फी कोणत्याही सबबीवर परत मिळणार नाही.

(5)(A) अट क्र. ३ मधील प्रत्येक अनुक्रमांकातील दर्शवलेल्या वक्कलसाठी बोली लिलावात जे खरेदीदार सर्वात जास्त रक्कम देतील त्यांना त्या अनुक्रमाकांतील वक्कलची लाकड अंतिम झाल्यावर त्यांनी **त्या अनुक्रमांकातील वक्कलच्या मान्य झालेल्या रक्कमेची पूर्ण रक्कम ज्या त्या अनुक्रमांकातील वक्कलचा लिलाव झाल्यापासून ३० मिनीटाच्या आत तात्काळ चेकने जमा करावा लागेल. चेक जमा**

**करण्याची व्यवस्था लिलाव जागेजवळच करण्यात आली आहे. सदर रक्कमेचा चेक जमा करण्याच्या दिलेल्या वेळेच्या आत जमा केला नाही तर सदर अनुक्रमांकातील वक्कलची लाकड आपल्या नावे अंतिम केली जाणार नाही व सदर अनुक्रमांकातील वक्कलचा पुन्हा लिलाव करण्यात येईल किंवा लिलावात जे खरेदीदार सेकंड हायर्स्ट रक्कम देणारे असतील त्यांची रक्कम भरण्याचे समितीने मान्य केल्यावर त्या खरेदीदार यांनी त्या मान्य झालेल्या रकमेख्या चेक २० मिनीटाच्या आत त्यांनी तात्काळ जमा करावा. चेक जमा केल्यावर त्या खरेदीदार यांना सदर अनुक्रमांकातील वक्कलची लाकड त्यांच्या नावे अंतिम केली जाईल किंवा विद्यापीठ लाकड विक्री गठीत समिती जो निर्णय घेईल ते अंतिम राहील.**

(B) सदर लाकड विद्यापीठ विक्री करत असून लाकड विक्रीवर GST लागू असल्यास बोली लिलावात जी रक्कम अंतिम होईल त्या रकमेतूनच GST ची रक्कम विद्यापीठ GST च्या खात्यात भरणा करेल. त्यामुळे खरेदीदार यांना GST ची रक्कम वेगळी दयावी लागणार नाही किंवा GST लागू नसला तरी लाकड विक्रीच्या बोली लिलावात जी रक्कम अंतिम होईल तीच पूर्ण रक्कम खरेदीदार यांनी नॅशनलाईज्ड बँकेचा चेक देवून तात्काळ जमा करावयाचा आहे.

(C) ज्या व्यक्तीस, संस्थेस, वखार (सॉमील) मालक, लाकूड विक्रेते ज्यांना ज्याही अनुक्रमांकातील एक किंवा एकापेक्षा जास्त अनुक्रमांकातील वक्कलची लाकड खरेदी करावयाची आहे त्या प्रत्येक अनुक्रमांकातील वक्कलच्या लाकडांची किंमत अंतिम झालेल्या त्या रकमेचा ज्या त्या अनुक्रमांकासाठी स्वतत्र नॅशनलाईज्ड बँकेचा चेक दयावा लागेल. **त्यामुळे प्रत्येक खरेदीदार यांनी सोबत नॅशनलाईज्ड बँकेचे चेक बुक आणावयाचे आहे.**

(D) जे ही लाकड खरेदीदार यांना ज्या ही अनुक्रमांकातील वक्कलच्या लाकडांची बोली लिलावात जी रक्कम अंतिम झाली असेल त्या प्रत्येक खरेदीदार यांनी त्या पूर्ण रकमेचा चेक देतांना तो चेक वटला पाहिजे याची खबरदारी घेवूनच चेक दयावयाचा आहे, चेक वटनार नाही (बाउंस होणार नाही ) असे होवू नये याची सर्वस्वी जबाबदारी त्या प्रत्येक खरेदीदार यांची राहील.

(E) बोली लिलावात लाकड विक्रीच्या अटी शर्तीतील क्र. ३ मधील अनु क्र. A to U मध्ये दर्शवलेल्या वक्कलनुसार जेही खरेदीदार यांचे ज्याही अनुक्रमांकामधील वक्कलच्या लाकडांची लिलावात जी रक्कम विद्यापीठाने मान्य केली त्या पूर्ण रकमेचा चेक वटला नाही ( बाउंस झाला ) तर त्या खरेदीदारावर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

(F) ज्या ही अनुक्रमांकातील वक्कलच्या बोली लिलावात ज्या ही खरेदीदार यांची रक्कम मान्य झाल्यापासून खरेदीदार यांना सदर रक्कम भरण्याची दिलेल्या वेळेच्या आत त्या रकमेचा चेक जमा केला नाही तर त्या खरेदीदारास त्यापुढील सर्व अनुक्रमांकातील वक्कलच्या लाकडांच्या बोली लिलावात भाग घेता येणार नाही.

(G) जे ही खरेदीदार एक किंवा एकापेक्षा जास्त अनुक्रमांकातील लाकड खरेदीसाठी ज्या त्या वेळेस फी भरतील त्या प्रथम वेळेसच अटी शर्तीची एकच प्रत (हार्ड कॉपी ) मिळेल. प्रत्येक वेळेस फी भरतांना अटी शर्तीची प्रत मिळणार नाही.

(6) अटी शर्तीतील क्र. ३ मध्ये दर्शवलेल्या तक्त्यातील अनु. क्र. A to U मध्ये दर्शवलेल्या वक्कलच्या लाकडांचा लिलाव त्या प्रत्येक अनुक्रमांकानुसार बोली लिलाव होणार आहे. **त्या प्रत्येक अनुक्रमांकाच्या बोली लिलावाच्या १ तास आधी प्रवेश 'फी ' रोख्रीने भरावी लागेल.** फी भरण्याची व्यवस्था लिलावाच्या ठिकाणी करण्यात आली असून फी भरल्यानंतर फी भरल्याचे चलन सदर ठिकाणीच देण्यात येईल. 'फी ' भरल्यानंतर

ज्या खरेदीदार यांनी ज्या अनुक्रमांकाची 'फी ' भरली असेल त्याच व्यक्तीस त्याच अनुक्रमांकातील बोली लिलावात भाग घेता येईल.

(7) विद्यापीठाने लाकड विक्रीसाठीच्या अटी शर्तीतील क्र. ३ मध्ये लाकड विक्रीचे A to U पर्यंतचे क्रम दिले आहेत त्या प्रत्येक क्रमात लाकडांचे वककल नंबर दिले आहेत ज्या अनुक्रमांकात जेवढे वक्कल नंबर दर्शविले आहेत. ज्या त्या वक्कल मधील तेवढी लाकड त्या अनुक्रमांकातील आहेत त्या प्रत्येक अनुक्रमांकच्या लाकडांचा लिलावाच्या वेळीज्या ही अनुक्रमांकामध्ये जितके वक्कल आहेत त्या वक्कलमध्ये जेवढी लाकडे आहेत जशी आहेत तशा स्थितीतले लाकड विक्रीला आहेत.

(8) लाकड विक्रा बोली लिलावाचा दि. / /२०१९ ते दि. / /२०१९ रोजी दररोज वेळ सकाळी ११-०० ते ०१-३० व दु. २-३० ते ५-०० यो वेळात होईल. अनु. क्र. A to U (एकूण २१ भाग) मध्ये दर्शवलेल्या लाकडांची बोली लिलाव असून **दिलेल्या तारखेतील बोली लिलाव एक दिवसात होईल किंवा दोन दिवसात होईल किंवा तिसरा दिवस लिलावाचा शेवटचा दिवस राहील.**

(9) ज्या व्यक्तीस, संस्थेस, वखार (मालक), लाकड विक्रेते आपणापैकी ज्या कोणासही ज्या ही अनुक्रमांकातील वक्कल व जितकेही अनुक्रमांकातील वक्कलचे लाकड देण्याचे अंतिम झाले त्यांनी पूर्ण रक्कम भरतांना खालील कागदपत्र जमा करावे लागतील.

**(a) स्वतः व्यक्तीशः घेणाऱ्या व्यक्तींसाठी :-**

(i) पॅन कार्डची सेल्फ अटेस्टेड छायांकित प्रत आवश्यक आहे.

(ii) आधार कार्डची सेल्फ अटेस्टेड छायांकित प्रत आवश्यक आहे.

**(b) संस्थेसाठी :-**

(i) संस्थेचे रजिस्ट्रेशनची छायांकित प्रत. सदर प्रतीवर संस्थेचे अध्यक्ष / सचिव या पैकी कोणा एकाची सही, शिक्का असणे आवश्यक आहे.

(ii) संस्थेचे सन २०१७-१८ व २०१८-१९ या पैकी ज्याही वर्षाचे रिटर्न दाखल केले असेल त्याची छायांकित प्रत पैसे भरतांना जमा करणे. सदर प्रतीवर संस्थेचे अध्यक्ष / सचिव या पैकी कोणा एकाची सही, शिक्का असणे आवश्यक आहे.

(iii) संस्थेचे पॅन कार्डची छायांकित प्रत व **GST नंबर असल्यास** GST ची छायांकित प्रत. सदर प्रतीवर संस्थेचे अध्यक्ष / सचिव या पैकी कोणा एकाची सही, शिक्का असलेली प्रत पैसे भरतांना जमा करणे. (असल्यास)

**(c) वखार (सॉमील) मालक व लाकूड विक्रेत्यासाठी :-**

(i) वखार (सॉमील) मालक व लाकूड विक्रेते यांचे रजिस्ट्रेशनची छायांकित प्रत. सदर प्रतवर मालकाची किंवा प्रोप्रायटरची सही, शिक्का असलेली प्रत आवश्यक आहे.

(ii) वखार (सॉमील) मालक व लाकूड विक्रेते यांचे सन २०१७-१८ व २०१८-१९ या पैकी ज्याही वर्षाचे रिटर्न दाखल केले असेल त्याची छायांकित प्रत.

(iii) वखार (सॉमील) मालक व लाकूड विक्रेते मालक किंवा प्रोप्रायटर यांचे पॅन कार्डची छायांकित प्रत

आवशक आहे व **GST नंबर असल्यास** GST नंबरची छायांकित प्रत. सदर प्रतीवर सही, शिक्का आवश्यक आहे.

(10) ज्या खरेदीदारास ज्या अनुक्रमांतील ज्या वक्कलची लाकड घेण्याचे विद्यापीठाने मंजूर केले असेल त्या अनुक्रमांकातील वक्कलच्या लाकडांची बोली लिलावातील रक्कमेचा चेक वटल्यावरच सदर खरेदीदार यांना लाकड घेवून जाण्यासाठी वन विभागाचा परवाना घेण्यासाठीचे विद्यापीठाचे पत्र खरेदीदार यांना देण्यात येईल. त्या वक्कलच्या लाकडांसाठी **वन विभागाकडून लाकडांचा परवाना (पास) काढण्याची जबाबदारी व त्यासाठी लागणारा खर्च खरेदीदार यांनी करावयाचा आहे. सदर परवानासाठी विद्यापीठ वन विभागास खरेदीदाराचे नाव टाकून पत्र तयार करून ते पत्र खरेदीदार यांनी विद्यापीठाकडून घेवून पुढील कार्यवाही करण्याची सर्वस्वी जबाबदारी लाकड खरेदीदार यांची राहील.** तसेच सदर अनुक्रमांकातील ज्याही वक्कलमधील लाकडासांठी परवाना पासची आवश्यकता नसेल तर तसे NOCचे पत्र वन विभागाकडून आणण्याची जबाबदारी खरेदीदार यांची राहील.

**(11)** ज्या खरेदीदारास ज्या वक्कल नंबरची लाकड घेवून जाण्याचे विद्यापीठाने मान्य केले व त्या वक्कल नंबरचे लाकड घेवून जाण्याच्या परवानगीचे विद्यापीठाने **पत्र दिल्यापासून वन विभागाकडून वन विभागाचा परवाना (पास) किंवा NOC विद्यापीठातील उद्यान विभागात जमा करनेसह विद्यापीठाचे कार्यालयीन २० दिवसाच्या आत घेवून जाणे.** त्यानंतर जे ही खरेदीदार आपल्या वक्कल नंबरची लाकड नेण्यास उशीर करतील त्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही. लाकड नेले किंवा नेले नाही तरी कोणत्यही सबबीवर भरलेली रककम परत मिळणार नाही.

**(12)** ज्या अनुक्रमांतील ज्या वक्कलचा लिलाव अंतिम झाला ते खरेदीदार वन विभाग, एरंडोल यांच्या कडील परवाना (पास) किंवा NOC चे पत्र आणून विद्यापीठात जमा केल्यावर लाकड तात्काळ घेवून जावू शकतात.

**(13)** लाकड खरेदीदार यांनी लाकड वाहून नेण्यासाठी लागणारे वहान आणने. वाहतूक खर्च, लाकड वहानात भरण्यासाठी लागणारे मजूर, मजूरांचा खर्च, मजूरांना ने आण करणे या व इतर कामासाठी येणाऱ्या खर्चाची सर्वस्वी जबाबदारी खरेदीदार यांची राहील

**(14)** लाकड भरतांना, लाकड वाहून नेतांना काही दुखापत / अपिरिमित घटना घडली त्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.

**(15) कोणताही वादविवाद उदभवल्यास लाकड विक्री गठीत समिती जो निर्णय घेतील तो अंतिम राहील.**

**(16)** विद्यापीठ कोणत्याही अनुक्रमांकातील वक्कलची लाकड विक्री करण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार राखून ठेवत आहे.

**(17)** ज्या ही खरेदीदारास ज्या अनुक्रमांकात दर्शवलेले वक्कल नंबरचे लाकड देण्याचे अंतिम झाले आहे त्या अनुक्रमांकातील वक्कलचे लाकड भरण्यासाठी विद्यापीठात वाहन घेवून आल्यावर लाकड वाहनात भरण्यापूर्वी उद्यान विभागाला सांगणे आवश्यक आहे. उद्यान विभाग प्रतिनिधी देईल त्या प्रतिनिधीसमोर लाकड गाडीत भरता येईल.लाकड गाडीत भरून झाल्यावर भरलेला ट्रक विद्यापीठाच्या मुख्यप्रवेशव्दाराबाहेर जावू देण्याच्या परवानगीचे पत्र उद्यान विभागाकडून घेणे व सदर पत्र मुख्य प्रवेशव्दाराच्या सिक्यूरिटीकडे जमा केल्याशिवाय सिक्यूरिटी वाहन जावू देणार नाही.

**(18)** ज्या खरेदीदारास ज्या अनुक्रमांकतील वक्कल नंबरची लाकड देण्याचे मंजूर झाले त्याच वक्कलची लाकड गाडीत भरणे इतर दुसऱ्या कोणत्याही वक्कलमधील लाकड भरू नये याची खबरदारी घ्यावी. भरतांना आढळल्यास सदर खरेदीदाराने खरेदी केलेली ती स्वत:चीही लाकड त्यास घेवून जाता येणार नाही व त्यांनी भरलेली रक्कम कोणत्याही सबबीवर परत मिळणार नाही.

**(19)** ज्या त्या खरेदीदार यांनी लाकड भरण्यासाठी आणलेल्या वाहनाने विद्यापीठाचे कोणतेही नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावयाची आहे. नुकसान केल्यास / झाल्यास वाहनधारकाकडून नुकसानीची वसूली करण्यात येईल. वसूली झाल्यावरच वाहन सोडण्यात येईल याची खबरदारी घ्यावी तसेच खरेदीदार यांनी वाहनचालकाला आपण आपल्या स्तरावर तसे निर्देश दयावे.

**(20)** ज्या त्या खरेदीदार यांनी वहानात लाकड भरण्यासाठी आणलेल्या मजूरांकडून विद्यापीठाचे कोणतेही नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावयाची आहे. नुकसान केल्यास/झाल्यास खरेदीदाराकडून नुकसानीची वसूली करण्यात येईल. वसूली झाल्यावरच लाकडांनी भरलेले वाहन जावू देण्यात येईल. याबाबत मजूरांना आपण आपल्या स्तरावर निर्देश दयावे.

**(21)** लाकड भरून नेण्याचा वेळ सकाळी ९-०० ते संध्या. ५-३० च्या आत राहील.

(22) **पान क्र. ०१ ते ०६ वर असलेल्या सर्व अटी शर्तींची एकत्रित प्रत मी लाकड खरेदीदार लिलावात भाग घेण्याची प्रवेश 'फी' भरतांना सदर अटी शर्तींची प्रत विद्यापीठाने मला दिली आहे. त्या सर्व अटी शर्ती मी वाचल्या असून मला त्या मान्य असल्यामुळे प्रवेश फी भरून मी लाकड खरेदीदार बोली लिलावात भाग घेत आहे.**